महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२०/तेवीस

दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२३.

**-:प्रसिद्धीपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२०
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.
संदर्भ :- जाहिरात क्रमांक २६०/२०२१.

महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा - २०२० या परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या शारीरिक चाचणीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारीरिक चाचणी, महाराष्ट्र पोलीस अकादमी, त्र्यंबकरोड, नाशिक येथे दिनांक ८ ते १७ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत घेण्यात आली आहे. सदर शारीरिक चाचणीतून मुलाखतीसाठी अर्हतापात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ८ ते २५ मार्च, २०२३ या कालावधीत खालीलप्रमाणे घेण्यात येणार आहेत.:-

| दिनांक | मुलाखतीचे ठिकाण | वेळ |
|---|---|---|
| दिनांक ८ ते २५ मार्च, २०२३ | यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११००७. | सकाळी ८.०० वा. |

२. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येत आहे. मुलाखतीच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांनी मुलाखतीकरीता विहित दिनांकास व विहित वेळेवर उपस्थित रहावे.

३. मुलाखतपत्र उमेदवारांच्या प्रोफाईलवर स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येईल.

ठिकाण : मुंबई.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.